# लडाख (भाग २) - 'क्यामेरा' क्या तेरा

चालती ट्रेन थांबूच नये; ती पळतच रहावी असं जरी आपल्याला वाटत असलं तरी मधल्या स्टेशनवर ती थांबतेच. आमची पश्चिम एक्स्प्रेसही बोरिवली स्टेशनवर थांबली. ए.सी.३ टायरच्या त्या बोगीत आम्हा मित्रांना आतल्या बाजूच्या ६ सीट मिळाल्या होत्या. बाजूच्या दोन सीटवर एक लेकुरवाळी बोरिवलीला येऊन बसली. तिच्याबरोबर बरंच सामान आणि वर्षाच्या आतलं एक बाळ व ५-६ वर्षांचा एक मुलगाही होता. बाहेर बहुतेक तिचे वडील तिला बसवून द्यायला आले होते. आमच्या सीटवर कुटुंब असतं तर बरं झालं असतं अश्या नजरेचा एक कटाक्ष टाकून तिला अनेक सूचना देऊन हात हलवेपर्यंत गाडी सुटली. गाडीने वेग घेतला तसा हळूहळू आमच्या गप्पांनांही सूर सापडला. हसणं खिदळणं चालू झालं, आत्माराम परबही आमच्यात येवून बसले आणि गप्पांचा ओघ नव्या जोमाने सुरू राहिला. त्या बाईने समोरच्या सीट्खाली आपलं सामान लावलं, त्यात एक निळ्या रंगाचा पिव्हिसीचा ड्रम होता. तो सारखा लुडबूड करू लागला, त्याला मग इतर सामानाचा आधार देऊन तिने स्थिर केला. आम्ही ते पहात होतो, 'ड्रम मध्ये माल भरलाय' कुणीतरी म्हणालं. अशावेळी मूड एवढा लाईट असतो की छोटसं कारण मिळालं तरी आपण हसत सुटतो. तेव्हाही तसंच झालं. त्या बाईला वाटलं की आमचं त्या ड्रमवर लक्ष आहे. थोड्या वेळाने ती फ्रेश व्हायला म्हणून उठली. मोठ्या मुलाला सामानाकडे लक्ष देण्यास सांगून ती निघाली आणि लगेचच परत येवून त्या ड्रमच्या झाकणाकडची बाजू आतल्या बाजूला करून आणि आमच्याकडे एक नजर टाकून निघून गेली. कुणीतरी त्या मुलाला नाव विचारलं, कुठे जाणार वैगेरे चौकशी करुन त्या ड्रममध्ये काय आहे? असा प्रश्न केला. त्याने लाडू इत्यादी फराळाची नावं सांगितली. आम्हाला देशील का? विचारलं. तो थोडा सावध झाला. ड्रमला पाय लावून बसला. आम्ही पुन्हा गप्पांत रंगून गेलो. दुपारनंतर थोडी शांतता पसरली, गाडी वेगाने चालली होती, तेव्हढ्यात त्या ड्रमने जागा सोडली आणि तो वाटेत येऊन लुडबडू लागला. कुटुंब पेंगत होतं. आमच्यापैकी कुणीतरी तो ड्रम आत ढकलताना झाकण बाहेरच्या बाजूला राहील याची काळजी घेतली, हास्याची एक लकेर घेऊन पुन्हा नव्या विषयाकडे गप्पा वळल्या. थोड्या वेळाने ती लेकुरवाळी उठून बसली, ड्रम थोडा बाहेर आला होता. तो आत ढकलताना झाकणाची बाजू बाहेर पाहून ती चमकली. आमच्याकडे संशयी नजर टाकून तिने तो ड्रम तसाच आत ढकलला. तिची चुळबूळ चालूच होती. मग तिने सरळ उठून ड्रम उभा केला आणि उघडून पाहू लागली. आमच्याही नजरा तिकडे वळल्या. आत बराच फराळ भरलेला होता, तो शाबूत होता हे पाहून ती शांत झाली. तुम्ही काय अगदीच टपोरी नाही अशा अर्थाने आमच्यावर नजर फिरवून ती बाळाला मांडीवर घेवून खिडकी बाहेर पाहात असतानाच पुन्हा ड्रम जागा सोडून इकडे तिकडे जाऊ लागला. आता ते धूड आत रेटायचं काम आम्हीच करू लागलो, त्याची मालकीण हलायची तसदीही घेत नव्हती.

दुसऱ्या दिवशी सोनिपत, पानिपत करत गाडी अंबाल्याला पोहोचली. आम्हाला इथेच उतरायचं होतं. उतरलो आणि चढ-उतर करून एक नंबर प्लॅटफ़ॉर्मवर आलो. आता कुठे जायचं! गेटवर दोन टीसी आणि खूप सामान घेतलेला एक माणूस दिसला, बघतो तर काय ते आत्माराम परबच होते. पाठीवर मोठी ट्रेकिंग सॅक, पुढे छोटी सॅक, दोन्ही खांद्यांना चार पिशव्या, ट्रेकिंगच्या आकड्याने ते सगळं अडकवलं होतं पठ्ठ्याने. साक्षात सुसाईड बॉम्बर! याला पाहून कुणालाही चार हत्तींचं बळ येईल. आम्हाला ते पाहिजेच होतं. कारण आम्ही लडाखला चाललो होतो, लडाखला...

चंदीगढमधल्या एका हॉटेलमध्ये त्यांनी आमची थोडा आराम आणि फ्रेश होण्यासाठी सोय केली होती. बस तिथे पोहोचताच चार-चार जणांना मिळून एक रुम देण्यात आली. सगळेजण पांगले.
तासा-दिड-तासाने हॉटेलमधल्या एका हॉलमध्ये सर्वांना एकत्र बोलावण्यात आलं. ४०-४२ जणांचा ग्रुप होता. ओळख करून द्यायचा कार्यक्रम झाला, मग पुढील प्रवासाविषयी सूचना दिल्या गेल्या. (ओळखपरेड मधली परब आणि प्रभू ही दोनच नावं आणि बरोबर मडव, आम्ब्रे, कीर ही नावं सोडून बाकीची मला सोडून पुन्हा आपल्या जागी गेली होती.) तीन टूर लीडर होते. स्वत: आत्माराम परब, सागर सावंत आणि कौस्तुभ उपाध्ये. आता पंधरा मिनिटांत निघायाचं आहे, तेव्हा सगळ्यांनी बॅगा घेऊन खाली या, या सूचनेबरहुकूम मंडळी रिसेप्शनला जमली. आपण कुठेही गेलो किंवा जमलो की या पृथ्वीतलावर फक्त आपणच आहोत आणि समोरच्याला मोठ्या आवाजातलंच समजतं अशा प्रकारे आपलं बोलणं असतं, तसं ते चालू होतं, पण स्वर भांडणाचा नव्हता. गप्पाच चालल्या होत्या, आम्हीही त्यात सामिल होतो. काल ट्रेनमध्ये बसल्यापासून अखंड बडबड करून आमचं समाधान झालं नव्हतं. जणू उद्यापासून सहल संपेपर्यंत मौनव्रत असल्याने आत्ताच कोटा पूर्ण करायचा होता. (शाळेत असताना वर्गात केलेली बडबड मला इथे आठवते, कुणाबरोबरही बसवा मी बोलायचोच, शेवटी वर्ग शिक्षकांनी मला मुलींमध्ये बसवला, तर मी त्यांनाही बोलतं केलं होतं. असो.)

भांडणाचा स्वर नव्हता असं मला वाटलं तरी थोड्या वेळाने तो ऐकू यायला लागला. आई-बाबा आणि मुलगा असं युनिट असलेल्यात त्या दोन तासांसाठी आणखी एका ७३ वर्षांच्या बाईं अशी चार जणांना मिळून एक खोली दिली होती. आणि त्या बाबांचं म्हणणं होतं की त्या त्रयस्थ बाईने दार उघडं टाकल्याने त्यांचा कॅमेरा चोरीला गेला होता. त्या बाईंना घालून पाडून बोलल्यावर तक्रार आत्माराम परबांकडे केली जात होती. दुसऱ्यांच्या भांडणात खूपच रस असल्याने मघापासून चाललेली गडबड शांत झाली आणि जो तो विषय समजून घेण्याची धडपड करू लागला. त्या वयोवृद्ध बाई रडवेल्या झाल्या होत्या. बाबामहाराज ऐकायला तयार नव्हते. आता कॅमेरा तर गेला, इथे थांबून काय होणार असं म्हणून आत्माराम परबांनी सगळ्यांना बसमध्ये बसण्याची सूचना केली. हे म्हणजे गणेश पूजेलाच कुसका नारळ निघाला अशी आत्माराम परबांची चर्या झाली काय? अशी मालवणी शंका मला आली.

‘तसं नाही कॅमेरा माझा नव्हता, मी मित्राचा या सहलीपुरता आणला होता आता त्याला काय सांगू?’ त्यांची अखंड चिडचिड आणि त्या बाईंचं ओशाळलेपण घेऊनच बसने चंदिगढ सोडलं. शेवटी सगळ्यांनीच दुर्लक्ष केल्याने त्यांचा स्वर मंदावत गेला. बाहेर दिवेलागण होत होती, मात्र आतला अंधार संपायला तयार नव्हता.

अंधार सगळे व्यापण्या
रात्र काळी येतसे, पण
काळोख मनीचा खोल तो
उदयासही लावी पीसे

(क्रमश:)

**- नरेंद्र प्रभू**

http://prabhunarendra.blogspot.com/
http://shabdshabd.blogspot.com/